क्रं./कावि/सा.नि./अका/ई-निविदा/ 01 /2018
जिल्हाधिकारी कार्यालय,बुलडाणा
दिनांक :- 03 .10.2018

**लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019**
**चहापान,अल्पोपहार,भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक साहीत्याची पुरवठा करणेबाबत ई-निविदा सुचना**

******

लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 करीता ईव्हीएम प्रथमस्तरीय तपासणी,प्रशिक्षण वर्ग, मतदान यंत्रे सिलींग करणे ,मतदानाचा दिवस , मतमोजणी व इतर निवडणूक विषयक अनुषंगीक जिल्हास्तरीय कामाकरीता चहापान,अल्पोपहार,भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक बाबींचा पुरवठा करणेकरीता दर निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा,ई-निविदा मागवित आहे. ई-निविदा दाखल करणाऱ्या निविदा धारकांनी डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

**चहापान,अल्पोपहार,भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक साहीत्याचा पुरवठा करणेसाठीच्या कामकाजाचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. 04/10/2018 दुपारी 12.30 वाजता |
| 2 | ई-निविदा फॉर्म संकेतस्थळावर उपलब्ध | दि. 04/10/2018 दुपारी 12.30 वाजेपासुन |
| 3 | ई-निविदा भरणेसाठी माहीती देणेसाठी बैठक दिनांक वेळ व ठिकाण (Pre-bid) | दि.06/10/2018 सायं. 4.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय,बुलडाणा(निवडणूक शाखा) |
| 4 | ई-निविदा फॉर्म स्विकृती सुरु दिनांक व वेळ (Download and upload) | दि.04/10/2018 दुपारी 12.30 वाजेपासुन |
| 5 | निविदा शुल्क ऑनलाईन | 10000/- (अक्षरी दहा हजार फक्त) ना-परतावा |
| 6 | निविदा इसारा रक्कम ऑनलाईन | 25000/- (अक्षरी पंचविस हजार फक्त) |
| 7 | निविदा सुरक्षा अनामत रक्कम (डि.डि उपजिल्हा निवडणुक अधिकारी,बुलडाणा यांच्या नावाने) | 1,00,000/- (अक्षरी एक लाख फक्त ) |
| 8 | ई-निविदा फॉर्म स्विकृती अंतिम दिनांक व वेळ (Download and upload) | दि.18/10/2018 दुपारी 2.00 वाजेपर्यंत |
| 9 | ई-निविदा उघडणे दिनांक वेळ व ठिकाण | दि.19/10/2018 दुपारी 2.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय,बुलडाणा(निवडणूक शाखा) |

सदर ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती तसेच अधीक माहीती http://WWW.mahatenders.gov.in व www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**टिप :-** 1.सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघुउत्पादन उदयोंगांना निविदा शुल्क व इसारा रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात येत आहे.

2.पंजीकृत बेराजगाराच्या सहकारी सेवा संस्थाना/लोकसेवा केद्रांना बयाना रकमेतुन सुट देण्यात येत आहे.

दिनांक :- 03.10.2018
ठिकाण :- बुलडाणा

**स्वा/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा**

मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीत.

**उपजिल्हा निवडणुक अधिकारी,**
**बुलडाणा**

## चहापान,अल्पोपहार,भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक साहीत्याची पुरवठा करणेबाबत ई-निविदा सुचना अटी व शर्ती

1. वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेव्दारे Online पाहता येईल.या निविदेसंबधी पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रके ई-इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येतील .निविदेसंबधी उपरोक्त नमूद दिनांकामध्ये फेरबदल झाल्यास त्याची उपरोक्त नमूद संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.व्यक्तिगत सुचना देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
2. ई-निविदा दाखल करण्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्र आवश्यक आहेत.

### अ.तांत्रिक लिफाफा क्रंमाक-1

तांत्रिक निविदेच्या लिफाफयामध्ये खालील बाबी सादर कराव्यात.

A) निविदा धारकाचे संपूर्ण नाव,पता,दुरध्वनी क्रंमाक व ई-मेल आयडी

B) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम नुसार शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र (शॅप ॲक्ट मधील व्यवसायाचे स्वरुप)

C) पॅन कार्ड व आधार कार्ड छायाप्रत (स्वसाक्षांकीत छायाप्रत जोडावी)

D) आयकर विवरणपत्र अद्यावत मागील 03 वर्षाचे (FY 2015-2016, FY 2016-2017 ,FY 2017-2018)

E) काळया यादीत समाविष्ठ नसल्याचे हमीपत्र (रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर)

F) तहसिलदार यांचेकडील हैसीयत प्रमाणपत्र (Solvency Certificate) रु.5.00 लक्षाचे किंवा बॅंक गॅरंटी रु. 5.00 लक्ष

G) अनुभव प्रमाणपत्र (निवडणूक कामामध्ये चहापान,अल्पोपहार,भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक बाबींचा पुरवठा इ.पुरवठयाचे काम केल्याबाबत)

H) उपलब्ध ,साहीत्य व मनुष्यबळ यांची यादी सोबत जोडावी लागेल.

IJ) GST नोंदणी प्रमाणपत्र

J) दि.31 मार्च 2018 पर्यंत GST कर भरना केल्याबाबतचे प्रमाणपत्र

K) निविदाधारकाचे व फर्मचे स्थावर मालमतेविषयी विवरण

L) उलाढालीबाबत सनदी लेखापाल (CA) चे प्रमाणपत्र किमान रु.10.00 लाखापेक्षा (अक्षरी रुपये दहा लाखापेक्षा जास्त)

M) निविदा फी व इसारा रक्कम भरणा केल्याबाबतची पावती .

N) अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र

तांत्रिक लिफाफा क्रंमाक -1 मध्ये उपरोक्त A ते N ही सर्व कागदपत्रे स्वंय साक्षांकीत (Self Attested) करुन नमुद दिनांकापर्यंत Upload करावेत.सदर कागदपत्रे अपलोड करण्यास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

### ब) दराचा लिफाफा क्रंमाक 2

A. निविदेत नमुद केल्याप्रमाणे सर्व दर सर्व करासहीत नमुद करावे.
B. वरील कामाची संपूर्ण माहीती https://mahatenders.gov.in व www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
C. निविदा रक्कम व इसारा रक्कम ही महाराष्ट्र शासनाच्या माहीती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध online पेमेंट विकल्पाव्दारे भरावे.भरणा केल्यानंतर त्याची Scan Copy निविदेसोबत अपलोड करावी लागेल त्याशिवाय निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

3. वरील कामाची संपूर्ण माहीती https://mahatenders.gov.in व www.buldhana.nic.inया संकेतस्थळावर उपलब्ध असुन दिनांक 04/10/2018 रोजी दुपारी 12.30 वाजेपासुन ते दिनांक 18/10/2018 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत डाऊनलोड करता येतील व अपलोड करता येईल. या कामाचे निविदा प्रपत्र याच संकेतस्थळावर दिनांक 04/10/2018 दुपारी 12.30 वाजेपासुन भरण्यात येतील.
4. उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणताही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
5. पूर्ण माहीती भरलेली लिफाफा क्रं.1 ची तपासणी दिनांक 19/10/2018 रोजी दुपारी 2.30 वाजता निवडणूक शाखा जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे केली जाईल.तपासणी अंती पात्र निविदाधारकांची निविदा प्रक्रियेसाठी विचारात घेण्यात येईल.

6. लिफाफा क्रं.01 ची तपासणी केल्यानंतर पात्र कंत्राटदार यांचा लिफाफा क्रं 02 BOQ File दिनांक 20/10/2018 रोजी सायंकाळ 04.00 वाजता उघडण्यात येईल.
7. यशस्वी निविदाधारकास बुलडाणा जिल्हयातील 07 विधानसभा मतदार संघाची कार्यालये तसेच मध्यवर्ती निवडणूक व आवश्यकता भासल्यास अधिग्रहीत केलेल्या इमारत/जागा/मतदान केंद्रे इ.ठिकाणी चहापान,अल्पोहार व भोजन पुरवावे लागेल.
8. निविदा दाखल करतेवेळी निविदाधारकाच्या फर्मची वार्षिक उलाढाल किमान 10 लाखापेक्षा जास्त असल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. निविदाधारकास निवडणूक विषयक कार्यक्रमास भोजन पुरवठा करणेबाबतचा अनुभव जोडणे आवश्यक आहे.
10. निविदाधारकाने निविदेत कोणतीही सुचना/अट समाविष्ठ केल्यास ती निविदा अपात्र ठरविण्यात येईल.
11. यशस्वी निविदाधारकास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,निवडणूक निर्णय अधिकारी,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सुचनेनुसार सूचीत करण्यात येणाऱ्या ठिकाणी व वेळी अल्पापेहार,चहापान व भोजन यापैकी सर्व किंवा कोणतीही सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.,.
12. यशस्वी निविदाधारकांनी अल्पोपहार,चहापान,भोजन तयार करतांना रंग,मसाले,खाद्यतेल व इतर साहित्य मान्यताप्राप्त व प्रमाणीत दर्जाचेच वापरणे अनिवार्य आहे.अल्पोपहार,चहापान,भोजनानंतर कोणासही अन्न/चहापान बाधल्यामुळे काहीही त्रास झाल्यास त्यामुळे होणाऱ्या आर्थिक /व्यावसायीक हानीस जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय,बुलडाणा जबाबदार राहणार नाही.ते संबधित बाधीत व्यक्तींना द्यावयाची सर्व प्रकारची भरपाई ही ठेकेदारानीच देणे बंधनकारक राहील. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय,बुलडाणा याबाबत कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.
13. चहापानमध्ये चहा (साखरेसह व विनासाखर) कॉफी (साखरेसह व विनासाखर),दुध (साखर व विनासाखर) यांचा समावेश असेल.
14. अल्पोपहारामध्ये ठेकेदाराने पोहे,उपीट (उपमा),बटाटेवडा-सांबार,ईडली-चटनी व सांबार,पुरी-भाजी तसेच उपवासासाठी साबुदाना वडे-चटनी,नायलॉन चिवडा,साबुदान्याची खिचडी-दही/चटणी इ.पैकी निवडणूक निर्णय अधिकारी,सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी यांचे सुचनेनुसार नमूद ठिकाणी व वेळी पदार्थ पुरविणे बंधकाकारक राहील.
15. भोजनामध्ये एक कडधान्याची उसळ,पोळया ,किमान दोन भाज्या ,वरण,साधा/मसाले भात,लोणचे, 01 गोड पदार्थ,कांदा,लिंबु ई.पुरविणे बंधनकारक आहे.भोजनाबददल ,चहापानाबददल अल्पोपहाराच्या दर्जाबददल कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता सबंधित निविदाधारकाने घेणे आवश्यक आहे
16. अल्पोपहार व भोजन हे निवडणूक विषयक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना पॅकबंद व लीकपृफ पध्दतीने नेमूण दिलेल्या ठिकाणी व वेळी देणे बंधनकारक राहील.परिस्थितीनुरुप प्लेटमध्ये अल्पोपहार/भोजन देण्याची परवानगी दिली जाईल.
17. निविदाधारकांनी विधानसभा मतदार संघामध्ये पुरविलेल्या साहीत्याचा तपशिल या कार्यालयास सादर करतांना संबधित विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडून पुरविलेल्या साहीत्याची यादी प्रमाणित करुन सदरचे काम पूर्ण समाधानकारक झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. तदनंतरच देयकाची रक्कम या कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.
18. निविदा धारक स्वत: त्यांची संख्या अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षासंबधित असता कामा नये.तसेच कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांच्या हितसंबधी,नातेवाईक असता कामा नये,तसेच त्यांचे विरुध्द कोणताही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल/प्रलंबित असता कामा नये.
19. ठेकेदाराने अन्नपदार्थ तयार करतांना संबधित परिसर स्वच्छ ठेवण्याची दक्षता घ्यावी.तसेच शिल्लक अन्नाची विल्हेवाट योग्य रितीने लावावी.परिसरामध्ये अन्न टाकुन देवु नये तसेच काम संपविण्यापूर्वी वापरलेल्या संपूर्ण परिसर स्वच्छ करुन देण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल.
20. मत मोजणीच्या दिवशी चहापान व बिस्कीट,पॅकबंद,अल्पोपहार/भोजन इ.मतमोजणीचे टेबलवर पुरविणे यशस्वी निविदा धारकावर बंधनकारक राहील.तसेच निवडणूक विषयक अधिकारी/कर्मचारी यांच्या बैठका तसेच प्रशिक्षण व मतदान यंत्रे तयार करणे,साहित्य वितरण अशा प्रसंगी

आवश्यकतेनुसार निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची निर्देशानुसार चहापान व बिस्कीट,अल्पोपहार/भोजन इ .पुरविणे बंधनकारक राहील.

21. मतमोजणी केंद्रावर इमारतीचे निश्चित केलेल्या बाजुस निविदाधारकाला स्वतंत्र शामियाना टाकुन खुर्च्याची व्यवस्था करावी लागेल.
22. मतमोजणीचे दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या अधिकारी कर्मचाऱ्याव्यतिरिक्त इतर व्यक्तींना चहापान/अल्पोपहार/भोजन इ.पुरविल्यास त्याच्या खर्चाची प्रतिपूर्ती केली जाणार नाही याची यशस्वी निविदा धारकांनी नोंद घ्यावी.यासाठी आवश्यक कुपन्स पुरविणेची जबाबदारी संबधित निविदाधारकांची राहील.त्याचप्रमाणे उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी यांना सशुल्क सेवा स्वतंत्रपणे पुरविण्याची व्यवस्था निर्देशानुसार करावी लागेल.
23. स्वयंपाकासाठी व पिण्यासाठी आवश्यक स्वच्छ पाणी निविदाधारकाने स्वत: उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.याचप्रमाणे आवश्यक तेथे व आवश्यक तेवढया ठिकाणी स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल.तसेच आवश्यकतेनुसार Paclged water bottles/पाण्याचे पाऊच चा पुरवठा करावा लागेल.
24. निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात रु.500/- (रु.पाचशे फक्त) च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे.तसेच काळे यादीमध्ये नाव समविष्ठ नसल्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रु.100/- (रु.शंभर फक्त) च्या स्टँम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.तसेच निविदेमधील अटी व शर्ती मंजूर असल्याबाबत रु.100/- च्या स्टँम्पपेपरवर स्वघोषणापत्र दयावे लागेल.
25. निविदाधारकाच्या देयकातुन नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे अग्रीम देण्यात येणार नाही.
26. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा कोणतही बाबतीत विवाद उदभवल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
27. निविदाधाराकने दर नमूद करतांना त्यामध्ये कामासाठी येणारा सर्व खर्च व भरावे लागणारे वेगवेगळे कर या बाबी विचारात घेऊन दर नमूद करावा.यशस्वी निविदाधारकास या कार्यालयाकडून कोणतेही शासकीय/निमशासकीय कराची रक्कम देण्यात येणार नाही.आणी त्याबाबतच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.ते नियमानुसार आयकर व लागु असणारे इतर कर वजा करुन देयक अदा करण्यात येईल.
28. वरीलपैकी कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपूर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सबंधित ठेकेदाराविरुध्द निवडणूक नियमानुसार व भारतीय दंड संहीता (IPC) मधील उचीत कलमानुसार कारवाई केली जाईल.
29. सदर निविदेसंदर्भातील कोणत्याही न्यायालयीन खटला बुलडाणा जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविण्यात येईल.
30. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करणेचा/राखुन ठेवणेचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांनी राखुन ठेवला आहे.आवश्यकतेनुसार सेवेचा व वस्तुचा कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
31. शासनाकडून निधी उपलब्धततेनुसार देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. देयकाबाबत कार्यालयाच्या विरोधात आमरण उपोषण /आत्मदहण करण्याचा अधिकार राहणार नाही.उपोषण/आत्मदहण केल्यास सबंधित कार्यालय /शासन जबाबदार राहणार नाही.
32. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने विहीत वेळेत काम पूर्ण न केल्यास व त्याचा निवडणूक कामावर परिणाम होवु नये म्हणून अन्य फर्म/एजन्सी कडून काम करुन घेण्यात येईल व जास्तीचे खर्चाच्या फरकाची रक्कम संबधित निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल व सुरुवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकारजमा करण्यात येईल.तसेच निविदा किंमतीच्या 5% पर्यंत अतिरिक्त दंड आकारण्यात येईल.
33. निविदा मंजूर झालेल्यानिविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्यास सदर निविदा दुसऱ्या क्रमाकाचा (Second lowest) यांना देण्यात येईल व सुरुवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकारजमा करण्यात येईल.

34. निविदा मंजूर झालेला  निविदाधारक दंडाची रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत असेल तर सदर दंडाची रक्कम ही महसूल अधिनियम 1966 नुसार जमीन महसूल थकबाकी म्हणून वसुल करण्यात येईल.
35. निविदाधारक यांनी या कार्यालयास सादर केलेली देयके नियमानुसार देण्यात येतील.तसेच देयकामध्ये रक्कम कमी करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयास राहील.
36. काम निकृष्ठ दर्जाचे अथवा खराब दिसुन आल्यास आपले देयक दिले जाणार नाही.
37. सदर निविदेचा कालावधी हा करारनामा केलेल्या दिनांकापासुन पुढील 01 वर्षापर्यंत लागु राहील.
38. सदरचे कामकाज हे विहीत वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील.
39. मंजूर निविदाधारकाने 18 वर्षाखालील कामगार सदर कामाकरीता ठेवू नये.
40. निविदाधारकाकडून निविदेतील अटी व शर्तीचा अथवा संविधानीक कायदयाचा भंग झाल्यास निविदाधारक संपूर्णत: जबाबदार असेल.तसेच निविदाधारकाच्या कृतीमुळे अथवा निष्काळजीपणामुळे चहापाण,नास्ता,जेवण वाटप  चालू असतांना एखादया व्यक्तीचे अथवा संस्थेचे कोणत्याही प्रकारचे शारीरीक/आर्थिक अथवा वैयक्तिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारक यांची राहील.
41. निविदाधारक/संस्था यांना शासकीय /निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळया यादीत घोषित केलेले असल्यास अशा निविदाधारकांनी निविदा सादर करु नये.असे आढळून आल्यास अशा प्रकारची निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.
42. निविदाधारकाने निविदा फॉर्म पूर्णपणे अचूक भरणे अनिवार्य राहील.निविदाधारकाने निविदेमध्ये नमूद करावयाच्या दरामध्ये कोणतीही तफावत असु नये.दर हे भारतीय रुपयामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.तसेच नमूद दर हे अंकामध्ये व अक्षरामध्ये नमूद करणे बंधनकारक राहील.
43. बयाना रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय  असणार नाही.तसेच बयाना रक्कम ही http://WWW.mahatenders.gov.in या संकेतस्थ्ळावर ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची असल्याने मंजूर निविदाधारक वगळता इतर निविदा धारकांना त्यांनी भरणा केलेली बयाना रक्कम उक्त संकेतस्थळावरील ऑनलाईन प्रक्रियेच्या पध्दतीने आपोआप संबधित बँक खात्यावर परत मिळेल.याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता असणार नाही.
44. ई-निविदा संदर्भात केंद्र व राज्य शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश/परिपत्रक मध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी/ शर्ती व नियम लागू राहतील.
45. प्रस्तुत कामाचे स्वरुप विचारत घेता बुलडाणा जिल्हयातील स्थानिक कंत्राटदारास मंजुर करतांना प्राथम्याने विचार करण्यात येईल.
46. निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास निविदेसंबधींच्या बैठकींना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक इतर माहीती पुरविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे निविदाधारकाचे प्राधिकार पत्र (Bidders Power of attorney) देणे आवश्यक राहील.
47. सदर निविदेचा कालावधी लोकसभा व विधानसभा निवडणूक 2019 चे कामकाज पूर्ण होईपर्यंत असेल.आवश्यक वाटल्यास सदरचा कालावधी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांच्या मान्यतेने वाढवून दिला जाईल.
48. प्रस्तुत निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा/नाकरण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा यांनी राखुन ठेवला आहे.

दिनांक :- 03.10.2018

ठिकाण :- बुलडाणा

**स्वा/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी बुलडाणा**

मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीत.

**उपजिल्हा निवडणुक अधिकारी,**
**बुलडाणा**

# स्वघोषणापत्र

(रु.100 च्या स्टँम्प पेपरवर दयावयाचा मजकुर)

मी /आम्ही खालील सही करणार ---------------------------------------- वय------------ रा.-------------- --- घोषणापत्र लिहून देतोत की,लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 च्या अनुषंगाने ---------------------------- हे कामकाज पूर्ण करण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदा सुचना ------------------- अन्वये आम्ही सादर केलेल्या ई-निविदेमध्ये नमूद केलेली माहीती संपूर्णपणे खरी व बरोबर असुन ,सदर माहीतीच्या पृष्ठर्थ मी/आम्ही ई-निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे खरी व बरोबर आहेत.

मी /आम्ही असेही घोषीत करीतोत की,आमची फर्म मे------------------------------- शासकीय/निमशासकीय आस्थापना/संस्थांकडून कधीही निविदाधारकाच्या काळया यादीत समाविष्ठ करण्यात आलेली नाही.

उक्त नमुद माहिती चुकीची असल्यास अगर खोटी आढळून आल्यास ई-निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर मी/आम्ही भा.दं.वि.1860 च्या कलम 199,200 अन्वये कायदेशीर अथवा दंडनीय कारवाईस पात्र ठरु.तसेच मी/आम्ही सादर केलेली ई-निविदा देखील अवैध ठरेल.

स्वघोषणापत्र करणाराची स्वाक्षरी

स्वघोषणा करणाऱ्यांचे नाव